


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.२१ जून २०२५

## इकडे आड, तिकडे विहीर ; इराण-इस्रायल युद्धामुळे भारत अडचणीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२०, तेहरान :** इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष आठवडा उलटला तरीही सुरुच आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवरील हवाई हल्ले सुरुच ठेवले आहेत. यामुळे मध्य आशियातील तणाव वाढला आहे. खनिज तेलामुळे मध्य आशियाचं महत्त्व जास्त आहे. त्यामुळे मध्य आशियातील संघर्ष जगाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक ठरु शकतो. त्यातच आता या संघर्षामुळे भारताची कोंडी झालेली आहे. भारतानं या प्रकरणात तटस्थ भूमिका घेतली होती. पण आता इराणच्या आवाहनामुळे भारतासमोर धर्मसंकट निर्माण झालं आहे.

इस्रालयचा जाहीर निषेध करा आणि त्यांच्यावर दबाव टाका, असं आवाहन इराणचे भारतातील उपराजदूत मोहम्मद जवाद हुसेनी यांनी भारताला केलं आहे. भारतासारख्या मोठ्या आणि शांतताप्रिय देशानं इस्रायलचा निषेध करताना अग्रणी असायला हवं, असं हुसेनी म्हणाले आहेत. 'इस्रायलनं ऑक्टोबरमध्ये



हमासविरोधात ऑपरेशन सुरु केलं. त्यांच्यावर हल्ले केले. त्याचवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर इस्रायलचा निषेध केला गेला असता, तर आज त्यांनी इराणसारख्या देशावर हल्ला करण्याची हिंमत केली नसती,' असं हुसेनी यांनी म्हटलं आहे.

हुसेनी यांनी आंतरराष्ट्रीय अणू ऊर्जा एजन्सीच्या (आयएईए) निष्पक्षपणावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. 'इराणकडून कोणत्याही लष्करी आण्विक हालचाली सुरु नसल्याचं खुद्द आयएईएनं सांगितलं होतं. पण तरीही त्यांनी इस्रायलची बाजू घेतली आणि आमच्याविरोधात होत असलेल्या लष्करी कारवाईला पाठिंबा दिला. यामुळे आता आयएईएच्या निष्पक्षपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे,' असं हुसेनी म्हणाले.

'इराणच्या संरक्षण धोरणात अण्वस्त्रांना कोणतंही स्थान नाही. देशाला स्वत:च्या संरक्षणासाठी त्यांची गरज नाही. आम्ही आमचं संरक्षण स्वत: करु शकतो. त्यासाठी आम्हाला अण्वस्त्रांची आवश्यकता नाही. इराणकडून अण्वस्त्र निर्मितीसाठी युरेनियमचं शुद्धीकरण करत असल्याचे आरोप खोटे आहेत. ते आमच्याविरोधातील प्रचाराचा भाग आहेत,' असं हुसेनी यांनी सांगितलं.

भारत आणि इस्रायलचे उत्तम संबंध सर्वश्रृत आहेत. दोन्ही देशांनी अनेक संरक्षण करार केले आहेत. भारताची सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात इस्रायलचा मोठा वाटा आहे. कारगिल युद्धावेळी इस्रायलनं भारताला मोलाची मदत केली होती. आता याच इस्रायलविरोधात भूमिका घेण्याचं आवाहन इराणकडून करण्यात आलेलं आहे.

भारत आणि इराण यांचे संबंधदेखील सौहार्दाचे राहिले आहेत. इराणकडून भारताला तेलपुरवठा होतो. विशेष म्हणजे तेलाचं बिल चुकतं करण्यासाठी इराण भारताला बरीच मुदत देतो. हे बिल देण्यासाठी डॉलरची सक्ती नाही. इराणनं भारतीय चलन स्वीकारण्याची लवचिकता दाखवली आहे. इराणमधील चाबहार बंदर भारत विकसित करत आहे. तिथे भारताची प्रचंड मोठी गुंतवणूक आहे. त्यामुळे भारत इराणविरोधातही थेट भूमिका घेऊ शकत नाही.

## चोर घेऊन आलेल्या गाडीमुळेच फसले; पोलिसांची सिनेमा स्टाईल कारवाई, मोठी चोरी टळली

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२०, लोणार :** लोणार शहरातील मापारी गल्ली परिसरात चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांचा पोलिसांनी सिनेमा स्टाईल पाठलाग करून पर्दाफाश केला आहे. ही घटना २० जूनच्या सकाळी ३.३० ते ४.१५ वाजेच्या दरम्यान घडली असून पाच चोरट्यांनी एका इर्तिका गाडीमधून शहरात प्रवेश करून शरद लुनीया यांचे किराणा दुकान फोडले. परंतु त्यांच्या गाडीतूनच त्यांच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला.

प्राथमिक माहितीनुसार,आरोपी पाच जणांनी शहरातील मापारी गल्लीतील शरद लुनिया यांच्या किराणा दुकानावर लक्ष्य ठेवले होते.रात्रीच्या सुमारास दुकानाचे कुलूप तोडून गल्लयातील काही रोख रक्कम आणि किरकोळ साहित्य चोरले. चोरटे शहरातील अजूनही इतर दुकाने फोडण्याच्या तयारीत असतानाच गस्त घालणाऱ्या लोणार पोलिसांना संशयास्पद हालचालींचा सुगावा लागला.लोणार पोलीस निरीक्षक निमिष मेहेत्रे,सहा-पोलीस निरीक्षक गणेश इंगोले,धनंजय इंगळे,संतोष चव्हाण आणि त्यांच्या टीमने या चोरट्यांवर लक्ष ठेवायला सुरुवात केली. यावेळी चोरट्यांनी आपली इर्तिका गाडी घेऊन घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी अत्यंत तात्काळ आणि धाडसी निर्णय घेत चोरट्यांच्या गाडीचा पाठलाग सुरू केला.सिनेमा स्टाईलमध्ये काही अंतर चाललेल्या या पाठलागा दरम्यान






मेहकर रोडवरील वैभव पेट्रोलियम समोर चोरट्यांच्या गाडीचा अचानक टायर फुटला. त्यामुळे गाडीचा ताबा सुटून ती अपघातग्रस्त झाली.अपघात होताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चोरट्यांना शिताफीने अटक केली. यामध्ये पाचही आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले असून त्यांच्याकडून चोरीला गेलेली रोकड आणि साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यात वापरलेली इर्तिका गाडीही पोलिसांनी जप्त केली आहे.

**प्राथमिक चौकशीत हे आरोपी**
**परजिल्ह्यातील आरोपी**

१) कृष्णा सुदाम छोडीदार (वय ३४ रा बोकुड ता पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर)
२) साहेबराव उर्फ बाप्पा पराजी चाळक (वय ५० वर्ष) रा खडी रोड, बीड बायपास छत्रपती संभाजी नगर)
३)परमेश्वर अशोक गायकवाड (वय ३० वर्ष रा.कुंभेफळ ता जिल्हा छत्रपती संभाजी नगर)असून यापूर्वीही अशा चोरीच्या घटना घडविल्याचा पोलिसांना संशय आहे. या संपूर्ण कारवाईबाबत लोणार पोलिसांनी अचूक माहिती मिळवून वेळेत हालचाल करून शहरात घडणाऱ्या चोरीची मोठी घटना टाळली आहे. पोलीस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शना खालील टीमच्या सतर्कतेमुळे शहरातील इतर दुकानांना होऊ शकणारी हानी टळली आहे.

घटनेनंतर शहरात पोलिसांचे कौतुक होत असून व्यापाऱ्यांनी पोलिसांच्या तत्पर कारवाईबद्दल आभार व्यक्त केले आहेत. अटकेतील चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. लोणार पोलिसांच्या या धाडसी आणि वेळीच केलेल्या कारवाईमुळे शहरात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास अधिक बळकट होतांना दिसून येत आहे.

## सरकारी योजना सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवा : दीपक लंके



टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात प्रत्येक गावातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहचला जावा हाच हेतू निलेश लंके प्रतिष्ठानचा आहे. कागदपत्रांच्या बाबतीत सर्वसामान्य जनतेची शासन स्तरावर मोठी नेहमीच पिळवणूक होत असते हे ओळखून या शासकीय सेवा घरपोच मिळाव्यात हाच मुख्य उद्देश समोर ठेवून टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात शासकीय सेवांचा रेशन कार्ड कॅम्प आयोजित केला आहे.
**- बाळासाहेब खिलारी (अध्यक्ष निलेश लंके प्रतिष्ठान पारनेर)**

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील खडकवाडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो खासदार निलेश लंके यांच्या प्रेरणेतून टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांच्या या कार्याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके यांनी नमूद केले.

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील खडकवाडी गावात निलेश लंके प्रतिष्ठानने शासकीय सेवा घरपोच मिळाव्यात या उद्देशाने मोफत कॅम्प आयोजित केला. खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कॅम्पमध्ये रेशन कार्ड दुरुस्ती, नवीन रेशन कार्ड आणि अभा कार्ड (आरोग्य कार्ड) यासारख्या सुविधा मोफत देण्यात आल्या. यामुळे खडकवाडी आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेला मोठा लाभ झाला. बाळासाहेब खिलारी यांनी सांगितले की, ५०० हून अधिक लोकांनी या कॅम्पद्वारे रेशन कार्ड अपडेट आणि ऑनलाइन प्रक्रियेचा लाभ घेतला. कॅम्पच्या उद्घाटनाला राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कॅम्पला सामाजिक कार्यकर्ते मोहन रोकडे, युवा नेते अनिल गंधाक्ते, श्रीरंग रोकडे, सरपंच संजय रोकडे, भोद्रे सरपंच अभिजीत झावरे, गंगाधर बांडे, काकणेवाडी सरपंच अशोक वाळुंज, अशोक नऱ्हे, भाऊ निवडूंगे, दादा दळवी, राजू रोकडे, बजरंग गागरे, अशपाक हवालदार, नितीन ढोकळे, विष्णु शिंदे, सुभाष ढोकळे, सुयोग दाते, विशाल गागरे, रवींद्र ढोकळे, प्रदीप ढोकळे, योगेश शिंदे, डॉ. रावसाहेब आग्रे, मारुती आग्रे, विठ्ठल शिंदे, कैलास आग्रे, वैभव गुंड, सचिन भोर, बाबा भोर, विशाल वाडेकर, उत्तम नरे, बाळासाहेब नऱ्हे, प्रशांत धरम, डॉ. बाबासाहेब गांगड, डॉ. उदय बर्वे, दत्तात्रय साळुंके यांच्यासह टाकळी ढोकेश्वर परिसरातील सरपंच, उपसरपंच आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

निलेश लंके प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे शासकीय सेवांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचला.

## थोडक्यात

### महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ९ टक्के व्याजदराने कर्ज - मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.२०, ठाणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना तसेच विविध महामंडळाअंतर्गत सुरू असलेल्या योजनेमार्फत शासन महिलांचे आर्थिक सबलीकरण करीत आहे. या लाभार्थी महिलांना आता आर्थिकरित्या अधिक सक्षम करण्यासाठी नऊ टक्के अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शासनामार्फत सुरू असलेल्या महिलांसाठीच्या व्याज परतावा योजनेची मुंबई बँकेच्या कर्ज योजनेसह सांगड घालून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासंदर्भात वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार तथा मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार चित्रा वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, महामंडळाचे प्रतिनिधी, सहसचिव वि.रा. ठाकूर, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष मिलिंद कांबळे आदिसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री झाड फडणवीस म्हणाले की, महिलांना स्वयंपूर्ण उद्योजक बनविण्यासाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी महामंडळ आणि 'मुंबै बँक संयुक्तपणे हा उपक्रम राबविणार आहे. मुंबईतील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना आर्थिक साक्षर करण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक व सामुहिक कर्ज देऊन त्यांना उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी मदत केली जाईल. तसेच पर्यटन संचालनालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत विविध वैयक्तिक व गट कर्ज योजना राबविण्यात येतात. यामुळे महिलांना स्वत:चा व्यवसाय व उद्योग सुरू करण्यासाठी नऊ टक्के इतक्या अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### तामस्यात ८ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार !



**अक्षराज : रमेश पंडित**
**दि.२०, हिमायतनगर (नांदेड) :** हिमायतनगरतालुक्यातील तामसा या ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या एका मजुराच्या ८ वर्षाच्या मुलीसोबत ६० वर्षीय नराधमाने घरात अश्लील गैरवर्तन करून अत्याचार केल्याचे आरोपा खाली पीडित चिमुकलीच्या आईच्या तक्रारीनंतर पोस्को व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. नराधमाने चिमुकलीला त्याच्या घरासमोर खेळत असताना अत्यंत संताप जनक प्रकार करीत चिमुकलीवर बळजबरी अत्याचार केला. चिमुकलीने घडलेला प्रकार आईला सांगितल्यावर आईने नवरा व दिराला याची माहिती दिली. आरोपी बळी हरण याच्याविरुद्ध तामसा पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष स.पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर मुलीच्या आईची तक्रार कॅमऱ्या समोर जवाब घेऊन सोमवारी सायंकाळी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली आहे. तामसा पोलीस ठाणे अंतर्गत पोस्को अंतर्गत गुन्ह्याची मालिका चालू असून तामसा येथे तीन महिन्यातील तिसरा पोस्कोचा गुन्हा दाखल होण्याने संताप व्यक्त होत आहे. सहायक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुलीचा आईचा जबाब व्हिडिओ रेकॉर्ड करून गुन्हा दखल करण्याची प्रक्रिया केली. भारतीय न्याय संहिता अंतर्गत बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा व अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री.संपते यांच्याकडे आहे.

### मुंबईकरांच्या सुखकर प्रवासासाठी रेल्वे मंत्र्यांची मोठी घोषणा

**अक्षराज : संजय पंडित**
**दि.२०, मुंबई :** नुकत्याच मुंब्रा येथील झालेल्या भीषण अपघातानंतर केंद्र सरकार मुंबई लोकल बाबत गांभीर्याने पावले उचलताना दिसत आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच मुंबई भेटीत मोठी घोषणा केली आहे. पुढील ३ वर्षात मुंबई लोकलच्या फ ऱ्या दुप्पट करणार असल्याचे मंत्री वैष्णव म्हणाले आहेत. यामुळे मुंबईकरांचा प्रवास सुकर होण्याची शक्यता आहे. एका खाजगी वृत्तपत्राशी संवाद साधताना रेल्वेमंत्री म्हणाले की, महाराष्ट्रासाठी रेल्वे विभागाने यंदा ८१ हजार कोटींची तरतूद केली आहे. यात एकट्या मुंबई व एमएमआरमध्ये सध्या १६ हजार कोटींची कामे सुरू आहेत. तर मुंबईती सर्व लोकल ट्रेनना स्वयंचलित दरवाजे बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. येत्या नोव्हेंबर मध्ये या स्वयंचलित दरवाजांच्या प्रणालीसोबत पहिल्या लोकलची चाचणी केली जाणार आहे. पण सर्वच लोकल एसी करण्याला राजकीय विरोध झाला आहे, तरी आपण जास्तीत जास्त गाड्या वातानुकुलित करण्याचा प्रयत्न करत आहोत, असेही वैष्णव यांनी नमूद केले. वैष्णव पुढे म्हणाले, मुंबईत सध्या एकूण ३२०० फेऱ्या दररोज सुरु आहेत. त्या फेऱ्या आणखी वाढवण्याच्या हेतूने प्रयत्न सुरू आहे. टप्याटप्याने सुमारे ३०० अतिरिक्त लोकल ट्रेन सोडल्या जातील, लोकलची संख्या वाढविण्याचे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे प्रवास सुकर होईल. तसेच मुंबईतील दोन लोकलमधील अंतर हे चार मिनिटांवरुन अडीच मिनिटांवर आणण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करणार आहोत, जे करणारं मुंबई हे पहिलंच शहर ठरणार आहे.

## संपादकीय

### निवडणुका येती घरा...

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच इच्छुकांची धावपळ सुरू झाली आहे. इतके दिवस या निवडणुकांकडे नजरा लावून ताटकळत असलेल्या खालच्या फळीतील मंडळींचा वारंवार हिरमोड झाला. या निवडणुका खरोखरच होतील काय, याबद्दल त्यांच्या मनात काल-परवापर्यंत साशंकता होती. परंतु, महापालिका, नगरपरिषदा आणि जिल्हा परिषदांच्याही प्रभागरचनेचा कार्यक्रमच घोषित झाल्याने सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास सोडला. या निवडणुका याच वर्षात होणार असल्याची खूणगाठ बांधून इच्छुक कामाला लागले आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात अपेक्षेप्रमाणे पक्षांतरावरच अनेकांचा जोर दिसून येतो. त्यासाठी सत्ताधारी भाजप आणि पाठोपाठ शिवसेनेला (शिंदे गट) सर्वाधिक पसंती मिळत आहे.

नाशिक जिल्ह्यात इगतपुरीच्या माजी आमदार निर्मला गावित, नरेंद्र दराडे यांनी तीन आठवड्यांपूर्वीच शिंदे गटात दाखल होऊन अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला. राज्याच्या राजकारणात भूकंप घडवून आणणाऱ्या भाजपने आता पुन्हा धक्के देण्याची तयारी चालवली आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिकमध्ये येऊन गेल्यानंतर हा पक्ष कमालीचा सक्रिय झाला आहे. विधानसभा निवडणुकीला सहा महिने उलटल्यानंतरही पालकमंत्रिपदाचा तिढा सुटत नसल्याने मंत्री गिरीश महाजन नाशिकपासून अंतर राखून होते. परंतु, आता सिंहस्थ तयारी आणि संभाव्य प्रवेशांच्या निमित्ताने तेही तळ ठोकून आहेत. अनेक महिन्यांपासून रखडलेल्या पक्ष कार्यकारिणीच्या नियुक्त्याही मार्गी लावण्यात आल्या आहेत.

महाभारतातील अर्जुनाला झाडावरील पक्ष्याचा डोळा तेवढा दिसत होता, त्याप्रमाणे केवळ महापालिका निवडणुकांचा लक्ष्यभेद करायचा असल्याने भाजपने कोणतीही भिडभाड न बाळगता इतरांसाठी दरवाजे पुन्हा खुले केले आहेत. पक्षांतराच्या या अध्यायात आता सुधाकर बडगुजर आणि गणेश गिते यांचा समावेश करून घेतला जाईल. उपनेते बडगुजर यांची ठाकरे गटाने हकालपट्टी केली आहे. गितेंनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात उडी घेण्याचा जुगार खेळून पाहिला. परंतु, त्यांना हार पत्करावी लागली. या दोघांच्या संभाव्य प्रवेशाला भाजपमधील काही मंडळींनी जोरदार आक्षेप घेतला. तीन मातब्बर आमदार, चौदा माजी नगरसेवक आणि डझनभर पदाधिकाऱ्यांनी नेटाने विरोध केला. परंतु, 'पार्टी विथ डिफरन्स'चा दावा करणाऱ्या या पक्षाने तो लीलया झुगारला.

मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष आणि इतर नेत्यांच्या भेटीसाठी जाताना बडगुजरांवरील २९ गुन्हे तसेच सलीम कुत्ताशी असलेल्या दहशतवादी संबंधांची यादीच वाचून दाखविण्यात आली. परंतु, सारे काही आधीच ठरले असल्याने उपयोग झाला नाही. नेतृत्वाने डोळे वटारल्यानंतर भेटीनंतर बाहेर पडणाऱ्यांची अक्षरश: 'तत-फफ' झाली. वरिष्ठांकडून कानउघडणी तर झालीच. परंतु, या विषयावर शब्दही न बोलण्याची तंबी मिळाल्याने इतर कारणांसाठी नेतृत्वाची भेट घेतली, असा दावा स्वत:ला निष्ठावंत म्हणवून घेणाऱ्या मंडळींना करावा लागला. ऐन वटपौर्णिमेच्या दिवशी मंत्र्यांच्या बंगल्यांच्या आवारातील वटवृक्षाला फेऱ्या मारून रिकाम्या हाती परतण्याची वेळ महिला आमदारांसह पदाधिकाऱ्यांवर आली. येणाऱ्यांची कोंडी करण्यासाठी गेलेल्यांचीच कोंडी झाली. 'सहन होईना अन् सांगताही येईना,' अशी त्यांची अवस्था झाली. आता पक्षात दाखल होणाऱ्यांसाठी हारतुरे घेऊन जावे लागेल. इच्छा नसली तरी नवागतांचे स्वागत करावेच लागेल.

बडगुजर पक्षात नको म्हणून ज्यांनी पुढाकार घेतला, त्याच आमदार सीमा हिरे यांना नाशिक पश्चिममधून पुन्हा उमेदवारी नको म्हणून डझनभर स्वकियांनीच जाहीर विरोध दर्शवला होता. विधानसभा निवडणुकीच्या आधी हे नाट्य घडले होते. परंतु, शेवटी हिरेबाईंनाच उमेदवारी मिळाली आणि सर्वांच्या नाकावर टिचून त्या निवडूनही आल्या. वैयक्तिक करिश्मा म्हणून त्या निवडल्या गेल्या, की भाजपची व्यूहरचना यशस्वी ठरली, की लाडकी बहीण योजना महायुतीच्या उमेदवारांना पावली, यावर बराच खल होऊन गेला आहे. परंतु, हेच बडगुजर आणखी चार वर्षांनी उमेदवारीसाठी पक्षांतर्गत विरोधक म्हणून समोर उभे ठाकतील, तेव्हा हिरे यांच्याबाबत तो काव्यगत न्यायच झालेला असेल.

# माझ्या शेतकरी राजांचं जीवन



जूनच्या पहिल्या आठवड्यात रखरखत्या उन्हाच्या झळांची तीव्रता कमी झाली.ढग दाटून येऊ लागले.तसा शेतकरी राजा घरातील व इतर लग्न समारंभाधि कामे आटोपून शेतात मशागत करू लागला.उन्हाळ्यात नांगरून टाकलेली काळी आई उन्हाच्या कडक तडाख्याने तापलेली होती म्हणून की काय, बाप वरूण राजाला दया आली असावी आणि ढगांना दाटून येण्यास आमंत्रण दिले.वरूण राजा येईल, या आनंदाने रानातील झाडे- वृक्षवेली नाचू लागले.यासह वीजाही थयथय नाचू लागल्या,अन माझा शेतकरी राजा सुताराकडे जाऊन तिफन, कोळपणं, खुरपे, मोठे खुरपे, सिंकी, वखर काही भागात डवरा म्हणतात, बैलगाडी दुरुस्ती, अशी किरकोळ कामे करून घेऊ लागला. शेतकरी राजासाठी वरून राजाचे आगमन म्हणजे जणूकाही आनंदोत्सवच...!कारण या काळ्या आईच्या भरवशावरच त्याच्या सांसाराचा डोलारा उभा राहतो व उद्याची स्वप्न बघतो.

शेतातील मातीचे ढेकळं रिमझिम पावसामुळे थोडीशी ढिसूळ होऊ लागली,त्यात वखर,तिफन फिरवून अगदी भुसभुशीत केली. या भुसभुशीत काळ्या मातींवर जणू,कापूस अंथरला की काय असं छान मऊ वाटायला लागलं. थोड्याशा का होईना पण, वरूण राजाच्या येण्याने उन्हाच्या तीव्रतेची झळा कमी झाल्या अन धुळीनं माखलेली झाडांची पानही धुतली गेली आणि हि सृष्टी हिरवा शालू नेसल्याप्रमाणे भासू लागली.या मंद वाऱ्याने डोलणारी झाडं-वृक्षवेली आनंदाने नाचताना बघून, पशु-पक्षी आनंदाने आकाशातघिरट्या घालू लागली. बगळे, चिमण्या, कावळे, कोकीळ, तसेच फुलपाखरं हि, या झाडांवरून त्या झाडांवर स्वैराचार करताना दिसून येऊ लागली कारण, त्यांनाही या उन्हाच्या तीव्रतेपासून एक सुखद गारवा मिळू लागला असं वाटतंय.जमीन भुसभुशीत झाली. शेतकरी माय-बाप काडी कचरा उचलून बंधाऱ्यावर आणून टाकू लागला. अन शेत-शिवार स्वच्छ सुंदर दिसू लागली.चहुकडे काळ्या जमिनीवर गालिचा अंथरल्यासारखं वाटत आहे.

शेतकरी राजासाठी पावसाची चाहूल हि,आनंदाचा क्षण असला तरी जीवाचा घालमेल करणारा सुद्धा आहे. शेतीसाठी लागणारी बी-बियाणे खरेदीसाठी त्याला पैशाची निकड भासते. अशावेळेस,मात्र त्याच्याकडे पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे कुणाकडून तरी उसने, पासने घेऊन किंवा एखाद्या पतसंस्थेकडून, सहकारी सोसायटी कडून व्याज रूपाने कर्ज घ्यावे लागते. वाढती महागाईमुळे वाढलेले बी बियाणे खतांचे भाव यामुळे त्रस्त असतो म्हणून, पोटाला चिमटा देऊन, काटकसर करून,तो पैशाची जुळवाजुळव करताना दिसून येतो. एक एकीकडे कधी पावसाचा वर्षाव होऊन जमिनीचं पोट भरेल सांगता येत नाही.आणि एकीकडे शेत पेरणीचीसामग्रीची जुळवा जुळव या विचारातशेतकरी राजा दिसून येतो. एकदा का जमीन आईचं पावसाच्या पाण्यानं पोट भरलं कि, पेरणी करणं अत्यंत महत्त्वाचे असतं, कारण हिच निश्चित वेळ असते अन्यथा भविष्यातील शेतीमालावर त्याचा परिणाम होताना दिसून येतो. पिक दर्जेदार येत नाही. म्हणून योग्य वेळीच पेरणीला सुरुवात करावी लागते. साधारण जूनच्या पहिल्या ते दुसऱ्या आठवड्यामध्ये आपल्या महाराष्ट्रातील हवामानानुसार पेरणीचा काळ असतो. आणि याच काळात लेकरांच्या शाळेचे नवीन सत्र सुरू होण्याची वेळ असते. लेकरांसाठी कपडेलत्ते घ्याव की शेतीसाठी बी बियाणे,शेती उपयोगाचे अवजार घ्याव? हा गंभीर प्रश्न शेतकरीराजा समोर दत्त म्हणून उभा राहतो.जशी जशी वातावरणात बदल होऊन येणाऱ्या पावसाची चाहूल शेतकरी राजाला लागते,तसतसी तो बी-बियाण्या ची शेती उपयोगी अवजारांची जुळवा जुळव करून बैलगाडी न वावरातल्या छपरातून नेऊन ठेवतो. कारण,भरपूर प्रमाणात पाऊस पडला तर,गावाकडील पांद-रस्ते हे चिखलमय होतात त्यामुळे, गावाकडून वावराकडे बैलगाडी आणि वाहनानं शेत पेरणीच्या वस्तू घेऊन जायला अडचण निर्माण होते.

शेतकरी राजा या काळात आर्थिक विवंचनेतून जरी जात असला तरी,त्याच्या मनामध्ये भविष्यातील उत्पन्नाची आणि जगाला पोसण्याची उम्मीद असते.कुटूंबातीलच नाही तर,जगाचा पोशिंदा या नात्याने प्रत्येकाच्या ओठी अन्नाचा घास मिळावा याची चिंता असते.हे अतिशय पवित्र कार्य त्याच्या हाती परमेश्वराने सोपविले आहे. म्हणून तो सदाआनंदी आणि उत्साही असतो.या अश्या बिकट परिस्थितीतहि या विशाल हृदयाच्या शेतकरी राजाचे जीवन म्हणजे जुगारातील खेळासारखे असते. आज रोजी तो पावसाच्या भरवश्यावर आपल्या एक-एक रुपयाच्या कष्टाच्या कमईतील पोटाला चिमटा देऊन, काटकसर करून,जमा केलेल्या हजारो रुपयांच्या शेतीपेरणीच्या वस्तू माय माऊलीच्या उदरामध्ये पेरून ठेवतो.आणि तेही सर्व विनाशर्त...! ना कुठले करारपत्र,ना कुठले एग्रीमेंट परंतु,केवळ आणि केवळ परमेश्वराच्या भरवश्यावर आयुष्यातील एवढा मोठा जुगार खेळतो.अहो! येथे शंभर रुपयाचा विमा काढला तर, हजारो नियम अटी लागू असतात.विमाधारकांचेही अनेक प्रश्न असतात. मात्र हा माझा शेतकरी राजा हजार रुपयांचं बी-बियाणं या काळ्या आईच्या उदरामध्ये पेरवून मोकळा होऊन जातो, केवळ अन केवळ पाऊस-बाच्या भरवश्यावर....!

असा हा माझा शेतकरीराजा पावसाचे ढग दाटून येताना सुखावतो मात्र, त्याचं अंतकरणसुद्धा आतून शेती पेरणीसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदीसाठी लागणाऱ्या पैशासाठी व खर्चासाठी आतून दाटून येतं.पैशाची जुळवाजुळव करतांना तो वणवण भटकतो.त्यासह घरातील गरजा व लेकरांच्या शालेय गरजा भागवण्यात त्याच्या जीवाची घालमेल होते मात्र, तरीही हा जगाचा पोशिंदा समस्त जगाला सुखाने अन्नाचा घास मिळावा यासाठी झटत असतो. आपले दुःख लपवून ताठ मानेने जगत असतो.

**या जगाच्या पोशिंद्याला सलाम..!**

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो .९७६३२८२०७७**

# आमदार अडबाले यांनी प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२० चंद्रपूर :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चंद्रपूर येथील अधिकारी - कर्मचारी आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रलंबित ठेवत असल्याने समस्या निवारण सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. प्रलंबित समस्या दिलेल्या वेळेत सोडविण्याचे निर्देश देखील सभेत आमदार अडबाले यांनी दिले.



विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा ' समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रम ंतर्गत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने चंद्रपूर प्रकल्पाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत समस्या निवारण सभा नुकतीच पार पडली. आदिवासी आश्रमशाळा माध्यमिक शिक्षकांना ४८०० ग्रेड पे नुसार वेतन निश्चिती केल्यानंतरही सुधारित वेतन निश्चिती लागू केली नसल्याने सभेत लेखाधिकारी यांना आमदार सुधाकर अडबाले यांनी धारेवर धरले. वर्ष होऊनही देखील सदर प्रकरण निकाली न काढल्याने सदर मुद्दा सभेत चांगलाच गाजला. तसेच प्राथमिक शिक्षकांना ४३०० सुधारित वेतन निश्चिती लागू करावी. सदर प्रकरण ११ जुलै २०२५ पर्यंत निकाली काढण्याचे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना दिले. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जीपीएफ-एनपीएस २०२३-२४, २०२४-२५ पर्यंतच्या पावत्या ३० सप्टेबर २०२५ पर्यंत द्यावयाच. दरम हा १ तारखेला वेतन अदा करण्याबाबत सभेत ठरलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी व प्रलंबित सामूहिक, वैयक्तिक समस्यांवर चर्चा करुन समस्या तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी. लेखाधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

सभेला प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी टिंगुसले, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे महानगर अध्यक्ष दिगांबर कुरेकार, माजी जिल्हाध्यक्ष केशवराव ठाकरे, माजी जिल्हा कार्यवाह श्रीहरी शेंडे, सिटू संघटनेचे विभागीय अध्यक्ष रामदास खवशी, अनुदानित, शासकीय आदिवासी आश्रमशाळा संघटना चंद्रपुरचे अध्यक्ष प्रमोद साळवे, सचिव मनोज आत्राम, कार्याध्यक्ष चंद्रभान वरारकर, सदस्य बजरंग जेनेकर, महेश ताजने, सुरेश वरारकर, गोपाल बोबाटे, युवराज मेश्राम, विलास चुदरी, छाया मोहीतकर, जे. डी. राऊत, वाढोरे, काकडे, पिंपळशेंडे, धानोरकर, खोब्रागडे, बोधलकर, कसारे, कडू व इतर पदाधिकारी, समस्याग्रस्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## योगाभ्यास

धडाक्यात चालवतो
योगासनांचा क्लास
जाहिरात गाजलेली
चरबी होईलं खलास

तंदुरुस्त करु सकला
आमचा एकचं ध्यास
दोन महिन्यात अर्धा
होईलं पोटाचा व्यास

टायगरश्रॉफ आहोत
आपणा होती भास
बाहुबली मधला मी
सुडौल भासे विभास

बाजूलाचं बायकोचे
फास्टफूडसेंटर खास
क्लास भर दर्वळतो
भुरळ घाली नाकास

क्लासनंतर तिथे जा
आमंत्रण देतो वास
विरंगुळा हवा भला
रे दमलेल्या जीवास

दोन्ही धंदे नाही वांदे
चालले मस्त झकास
तत्व आमचे एवढेचं
सबका साथ विकास

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# आंतरराष्ट्रीय योग दिन !!



आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे.

पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला.

पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग.

आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे.

आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे माणगाव तालुक्यातील आदिवासी पाड्यांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप



**अक्षराज : कामेश कदम**

**दि.२०, पेण (रायगड) :** महाराष्ट्रातील सोळा किल्ल्यांवर मागील सतरा वर्षांपासून जतन संवर्धन मोहिमा करत असलेल्या दुर्गवीर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेतर्फे माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी, शिरवली तर्फे गोवेले आदिवासीवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

माणगाव तालुक्यातील किल्ले मानगडावर सलग १५ वर्षांपासून संवर्धन मोहीमा राबवत असतानाच गडरहाळातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, गणवेश, स्वेटर, क्रीडा साहित्य आजतागायत भेटस्वरुपात दिले आहेत. तसेच कुंभे, जोर धनगरवाडी, कुंभेवाडी अशा दुर्गम डोंगराळ भागातील नागरिकांसाठी सौरदिवे, गृहोपयोगी साहित्य, प्रथमोपचार संच इत्यादीचे वितरण केले आहे. तसेच सामाजिक बांधिलकीतून अनेक शाळांना लॅपटॉप, कॉम्प्युटर संच सुध्दा देणगीस्वरूपात दिले आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी तासगाव भागाड ग्रामपंचायत सरपंचांनी दुर्गवीर प्रतिष्ठानच्या या सातत्यपूर्ण समाजसेवेचे कौतुक केले.

या शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमात दुर्गवीर प्रतिष्ठानचे रायगड जिल्हाप्रमुख रामजी कदम, माणगाव तालुकाप्रमुख विठ्ठल केंबळे, माणगाव तालुका समन्वयक प्रमोद डोंगरे, दुर्गवीर रूपेश लाखाडे, अजित लाखाडे, सिध्दांत शिंदे उपस्थित होते.

## नशाबंदी मंडळाच्या मुबंई शहर संघटक पदी चेतना सावंत यांची नियुक्ती




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुबंई :** नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत व्यसनमुक्ती वर कार्य करणारी संस्था आहे. या संस्थेने ६७ वर्ष पूर्ण करून महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे नुकतेच आयोजन प्रयास, सेवाकुंर भवन दस्तुरनगर रोड, विमलनगर, फरशी फाटा, तालुका जिल्हा अमरावती याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुबंई शहर जिल्हा संघटक म्हणून चेतना सावंत यांना २०२५-२६ साठी मान्यता देण्यात आली. तसेच वर्षभरात संघटकाचे कार्याचे नियोजन करण्यात आले. संघटकांना साहित्यात पोस्टर, प्रत्रक, महाम ानवाने विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्ती वरील सापशिडी देण्यात आली.

यावेळी संघटक बैठकीचे उद्घाटन प्रयास संस्था चे अध्यक्ष डॉ.अविनाश सावजी, नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ७ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रत्येक जिल्ह्यात किमान १० शाळा तंबाखूमुक्त करण्याचा व प्रत्येक जिल्ह्यात ड्रग्स फ्री जिल्हा अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला. अशी माहिती नशाबंदी मंडळाचे अमरावती जिल्हा संघटक ज्ञानेश्वर जामनिक यांनी दिली आहे.

## भिवंडी-वाडा रस्त्याची दुर्दशा, वाहन चालक हैराण !



**अक्षराज : मोहन पोळ**

**दि.१९, भिवंडी, (ठाणे) :** भिवंडी ते वाडा - एसएच नं.३५ हा हायवे रोड जवळपास १७ ते १८ किलोमीटरचा आहे. गेली ५ वर्षांपासून या रस्त्याची अवस्था खराब असून प्रत्येक वर्षी पावसाळ्यात खूपच खराब असते. त्याचा या परिसरात राहणाऱ्या लोकांना फारच त्रास सहन करावा लागतो, सदर रस्ता खूपच खराब असून रस्त्यात खूप खड्डे पडलेले आहेत. रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता' हेच समजत नाही. एवढेसे अंतर कापण्याकरिता दीड ते दोन तास लागतात. येथे ट्राफिक हमेशा संथ गतीने चालत असते. अनेक वेळा ट्राफिक जाम होते. येथील नागरिकांनी वेळोवेळी आमदार व खासदार यांना विनंती केली आहे की हा रोड लवकरात लवकर चांगला बनवून सामान्य जनतेच्या अडचणी दूर कराव्यात. परंतु शासन आणि प्रशासन याच्याकडे दुर्लक्षच करत आहे.

## स्पार्क फाऊंडेशनकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.१९, मोखाडा :** शैक्षणिक वर्ष सुरू झाले की मुलांना नवीन कपडे, पुस्तके, बूट शासनाकडून मिळतात . मात्र लेखन साहित्य पालकांना बाजारातून विकत घ्यावे लागतात. ग्रामीण भागातील मोलमजुरी करणारे, पालक वर्षभराच्या मजुरीतून साठवलेले पैसे पेरणीच्या आणि शेतीच्या कामासाठी वापरतात मग मुलांना असे महागडे साहित्य कुठून घेणार हीच अडचण शाळेचे मुख्याध्यापक दिनकर फसाळे यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक काम करणारी स्पार्क फाऊंडेशनचे अध्यक्ष मकरंद दिक्षित, नितीन पिठोले यांच्या लक्षात आणून दिली. आणि आज दिनांक २०/०६/२०२५० रोजी जिल्हा परिषद शाळा कोचाळे येथे शाळेतील एकूण १२६ मुलांना , दुरेघी, चार रेघी, बॉक्स, चित्रकला वह्या, अंकलीपीआणि पेन, पेन्सिल, खोडरबर, शॉपनर, रंगखडू , कंपास पेटी, इत्यादी वर्षभर पुरेल एवढ शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले . प्रसंगी स्पार्क फाऊंडेशन चे जिल्हा प्रमुख नितीन पिठोले, शाळेचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. स्पार्क फाऊंडेशनचे हे शैक्षणिक कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामात गेल्या तीन चार वर्षापासून हातभार लावत आहे.

# जिल्हाधिकारी जावळे यांचे अलिबागमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचे आवाहन

**अक्षराज : कामेश कदम**

**दि.२०, रायगड :** रायगड शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त आहे. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. यानिमित्ताने जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, नामांकित खेळाडू, युवक तसेच लोकप्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योग दिन साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

१६ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत शिक्षणाधिकारी म हारुद्र नाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, जिल्हा युवा अधिकारी अमित फुंडे आणि राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी

उपस्थित होते. या सर्वांनी योग दिनाच्या महत्त्वावर भर दिला आणि जिल्ह्यात व्यापक प्रचार व प्रसार कसा करावा यावर चर्चा झाली. जिल्हाधिकारी किशन जावळे



म्हणाले, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या निर्देशांनुसार २१ जून २०२५ रोजी दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन

जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या दिवशी योगाचा प्रचार करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, ज्याम ध्ये चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचा समावेश आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाची प्रहारच्या वतीने सांत्वनपर भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, अहमदपूर (लातुर) :** मौजे थोडगा ता.अहमदपूर येथील शेतकरी कै.बाबूराव नागोराव चामवाड यांनी सततची नापीकी व कर्जाच्या बोजा याला कंटाळून दि.१५/०६/२५ रोजी शेतात जाऊन आत्महत्या केली होती. त्यांचा एकुलता एक नातु दोन्ही हातानी दिव्यांग आहे.

बचु कडु यांना आत्महत्या ग्रस्त कुटुंबाला फोनवर बोलुन सांत्वन केले. प्रहार जनशक्ती पक्षाचे माजी मंत्री मा.आमदार बच्चुभाऊ कडू यांनी शेतकर्यांचे कर्ज माफी व दिव्यांगाच्या मानधनासाठी ८ जून पासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. पण या तीनटांगी सरकारने वेळीच दखल घेतली नाही म्हणून आत्महत्येचे सत्र संपुर्ण महाराष्ट्रात चालू आहे. सत्तेत



येण्यापूर्वी याच सरकारने आश्वासन दिले होते की सहा महिन्यांत शेतकर्यांचे कर्ज माफ करु पण् सत्तेवर आल्यावर मात्र यांना शेतकर्यांची या अन्नदात्याची भुल पडली व सरकार हे सर्व सामान्यांच सरकार राहिलं नाही तर भृष्ट निर्दयी थापाड्या वसुली सरकार बनले. परिणामी शेतकरी बळी राजा हे कर्ज व सततच्या नापीकी अन् पिकविलेल्या अन्नधान्याचा योग्य भाव मिळत नाही म्हणून नैराश्यातून आपलं जिवन संपवत आहेत. मा बच्चुभाऊ यांच्या उपोषणाचा गांभीर्याने विचार करुन निर्णय घेतला असता तर आज माझा बळीराजा जगला असता. अहमदपूर मा तहसीलदार पांगरकर मॅडम यांना निवेदन देऊन तात्काळ पिडीत कुटुंबाला शासनाच्या वतीने मदत करण्यासाठी व त्यांचा दिव्यांग नातू त्यालाही शासकिय योजनांचा लाभ मिळावा यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी प्रहार जिल्हा प्रमुख राजाभाऊ चौघुले, जिल्हा सल्लागार अॅड विजयभाऊ पंडित, अहमदपूर तालुकाप्रमुख बाळू आमले, योगेश आमले, शिक्षक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब गाडगे, उपसरपंच मुंडे, मारुती भरडे, सोमनाथ भरडे, आदित्य चिकटे, वैजनाथ सुनेवाड आदी ग्रामस्थ व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंदी सक्तीच्या विरोधात गुहागर मनसे ॲक्शन मोडमध्ये...

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, गुहागर :**

**राज्यात हिंदी सक्तीची करण्याचा कोणताही निर्देश नाही. गुजरात मध्ये हिंदी सक्तीची केलेली नाही, मग फक्त महाराष्ट्रातच हे भाषा धोरण का लादले जात आहे? असा प्रश्न उपस्थित करत राज ठाकरे यांनी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना या निर्णयाचा उघडपणे विरोध करण्याचे आणि शिक्षणात मराठी भाषेचा सन्मान आणि भाषिक संतुलन राखण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.**

महाराष्ट्राच्या नवीन शिक्षण धोरणात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या करण्याच्या फडणवीस सरकारच्या निर्णयाला महाराष्ट्र नवनिम ाण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांनी तीव्र विरोध केला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण धोरणानुसार पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा म्हणून लागू करण्यात आली आहे. तर किमान २० विद्यार्थ्यांना इतर भाषा शिकवणे बंधनकारक आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी हा निर्णय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेविरुद्ध आणि म ातृभाषा मराठीच्या विरोधात असल्याचे आणि ते लादण्याची सरकारची



### मुख्याध्यापकांना राज ठाकरेंचं पत्र...

मानसिकता असल्याचे म्हटले आहे. राज ठाकरे यांनी या मुद्द्यावर राज्य सरकारला दोन पत्रे लिहिली आहे आणि आता तिसरे पत्र महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना तसेच तालुक्यातील सर्व शाळांमध्ये सदरचे पत्र देण्यात येत आहे. पत्राच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांतील सर्व मुख्याध्यापकांना पहिलीपासून सक्तीच्या हिंदी विषयाला आपण

> या 'सर्वसाधारण' सरकारला मराठी अस्मितेचा 'धडा' शिकवणे आता अनिवार्य झाले आहे.
> **- प्रमोद गांधी (मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष)**

देण्याचे धोरण आखले असून तसे मनसे सैनिकांना आदेश ही देण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने गुहागर मनसेने अंमलबजावणी सुरू केली आहे. गुहागर तालुक्यातील चिखली, जानवळे, पालपेणे, वाकी, कोंड शृंगारी उर्दू, पाटपन्हाळे, वरवेली विरोध करावा. अशी विनंती करण्यात आली. अक्षराज मीडियाशी बोलताना उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी सांगितले की, जिल्हा परिषद शाळांकडे विद्यार्थी संख्या कमी होत आहे, शिक्षकांची संख्या कमी होत आहे, मराठी व इंग्रजी या दोन भाषा अनिवार्य असून आता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची केली जात आहे हे योग्य नाही आज दुर्गम भागामध्ये शाळेच्या इमारतीची दुरवस्था होत आहे आणि इमारती मोडकळीस आल्या आहेत. याकडे शासनाने प्रथम लक्ष देणे गरजेचे असताना हिंदी भाषा सक्तीची करण्यामध्ये शासन लक्ष घालत आहे हे निषेधार्थ आहे. तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांनी सांगितले की, नवीन शैक्षणिक धोरणानुसार हिंदी सक्तीला राजसाहेब ठाकरे यांनी प्रखर विरोध दर्शवला असून शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना नक्कीच विरोध करेल, तामिळनाडू,आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक यांच्यासह अनेक राज्यात हिंदीची सक्ती केली जात नाही,..मग महाराष्ट्रातच ही सक्ती का केली जाते याचे उत्तरही राज्य शासनाने दिले पाहिजे.


यावेळी जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर, गुहागर तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर, उपतालुका अध्यक्ष जितेंद्र साळवी, उपतालुकाध्यक्ष अमित खांडेकर, पालशेत येथील दिलीप नार्वेकर, सांस्कृतिक विभाग राहुल जाधव , पत्रकार गणेश किर्वे आदी महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनसे कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल...

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२०, ठाणे (नवी मुंबई) :** महानगरपालिकेच्या वाशी येथील प्रथम संदर्भ रुग्णालयाच्या आवारातील शवागरातून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठी पालिकेच्या कर्मचार्याने दोन हजाराची लाच मागितली या तक्रारीनंतर सदर कर्मचार्याला तात्काळ बडतर्फ करण्यात आले. कर्मचार्याने पैसे घेतले हा मुळात गुन्हा आहेच, तरी हा आरोप हे पूर्ण सत्य नाही. त्याने पैशाची मागणी कोणत्या कारणासाठी केली ते कारण आपण जाणीवपूर्वक लपवत आहेत. शवविच्छेदनाचे काम करणार्या साध्या कंत्राटी कामगाराच्या भ्रष्टाचाराचे भांडवल आपण आपल्या प्रसिद्धीसाठी करून मराठी माणसाचा न्याय केला आहे.

खरतर हा कंत्राटी कामगार असल्याने त्याच्या निलंबनानंतर हे प्रकरण इथेच थांबवण्याची गरज होती. भविष्यात अशा गोष्टी टाळण्यासाठी उपाययोजनांची म ागणी कार्यकर्त्यांनी अधिक्षकांकडे करणे अपेक्षित होते. वैद्यकीय अधिक्षकांनी संबंधित कंत्राटदाराला सूचना दिल्यानंतर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.



पण राजकीय पक्षाच्या काही बॅनरबाज कार्यकर्त्यांनी वैद्यकीय अधिक्षकांच्या दालनात जाऊन धुडगूस घातला. राजकीय प्रसिद्धीसाठी कार्यकर्त्यांनी दालनात धक्काबुक्की करत वैद्यकीय अधिक्षकांच्या खांद्यावर प्रेताच्या शरीरावर गुंडाळण्यात येणारा श्वेत कपडा टाकून त्यांना अपमानीत केले. वैद्यकीय अधिक्षकांच्या शैक्षणिक दर्जाचे आणि रुग्णालयातील त्यांच्या स्थानाचे भान अशा कार्यकर्त्यांना असायला हवे होते. वैद्यकीय अधीक्षक म्हात्रे ह्यांचा शालेय जीवनापासून पुढील शैक्षणीक आलेख पाहिल्यास आपल्यालाच स्वत: अशी कृती करावी वाटणार नाही. वैद्यकीय अधिक्षक राजेश म्हात्रे प्रसूती तज्ञ म्हणून प्रसिद्ध असून आजपर्यंत त्यांनी हजारो शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. कोरोनो काळात कोरोना झालेल्या महिलेची म हाराष्ट्रातील पहिली यशस्वी प्रसूती शस्त्रक्रिया राजेश म्हात्रे ह्यांनी केली होती. त्यांच्या समर्थनार्थ पालिकेच्या सर्व कर्मचार्यांनी केलेले आंदोलन हे त्यांच्या प्रामाणिकपणाचे आणि त्यांच्या लोकप्रियतेचे द्योतक आहे.

सदर घटनेचा भावनिक विचार जरी केला तरी या कार्यकर्त्यांच्या ह्या कृतीचे समर्थन करता येणार नाही. रुग्णालयातील सर्व बर्यावाईट घटनांची जबाबदारी अधिक्षकांची असली तरी अधिक्षकांचा ह्या घटनेशी प्रत्यक्ष संबंध नव्हताच. निलंबनाची कारवाई ताबडतोब करून त्यांनी आपल्या कर्तव्याची पूर्तता केली होती. केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी आपल्या समाज माध्यमांवरील सदर घटनेच्या चित्रफितीवरून अधिक्षकच भ्रष्टाचारी असल्याचा चुकीचा संदेश आपण सामान्य जनतेत पसरवला गेला ही निंदनीय बाब आहे. सदर घटनेची दखल घेऊन पोलिसांनी संबंधीतांवर अजामिनपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# सातारा जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळी पर्यटकांवर १९ ऑगस्टपर्यंत निर्बंध

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२०, खंडाळ (सातारा) :** अजिंक्यतारा किल्ला, ठोसेघर धबधबा, केळवली-सांडवली धबधबा, वजराई धबधबा, कास पुष्प पठार, एकीव धबधबा, कास तलाव, बामणोली, पंचकुंड धबधबा, सडावाघापूर उलटा धबधबा, उरुल घाट शिवमंदिर धबधबा, रुद्रेश्वर देवालय धबधबा, ओझर्डे धबधबा, घाटमाथा धबधबा, लिंगमळा धबधबा तसेच महाबळेश्वर व पाचगणी पर्यटन स्थळ व धरणे अशा पर्यटन स्थळांच्या परीसरात पर्यटकांमुळे गर्दी होत असते. त्यावर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्बंध घालण्यासाठी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे.

पावसाळ्यातील पर्यटनासाठी येणा-या नागरीकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. याकरीता दिनांक २० जून ते १९ ऑगस्ट पर्यंत खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे. १) पावसामुळे वेगाने वाहणा-या पाण्यात उतरणे व पोहणे. २)




धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे, ३) पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे धबधबे, द-यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी सेल्फी काढणेस व कोणत्याही स्वरुपाचे चित्रिकरण करणे. ४) पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास व मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतुक करणे, अनाधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे,५) वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे. ६) वाहन अतिवेगाने अथवा वाहतुकीस अडथळा होईल असे वेगाने चालविणे. ७) वाहनांची ने-आण करतांना बेदकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे. ८) सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टिकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टिकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे. ९) सार्वजनिक ठिकाणी येणा-या महिलांची छेडछाड करणे, टिंगल टवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य अश्लिल हावभाव करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे. १०) सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डीजे सिस्टम वाजविणे, वाहनातील स्पिकर/उफर मोठ्या आवाजात वाजविणे यामुळे ध्वनी प्रदुषण करणे. ११) ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदुषण होईल असे कोणतीही कृती करणे. १२) धबधबे, धरणे व नदी आदी परिसरात सर्व दुचाकी, चारचाकी व सहाचाकी वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करणे (अत्यावश्यक सेवेतील वाहन वगळून) सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उल्लंघन केल्यास ते भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम मधील तरतुदी व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

# पाटण कोयना रस्त्याच्या दुरवस्थेला सध्याचे भाजप शिवसेना सरकार जबाबदार : नरेश देसाई

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण (सातारा) :** पाटण कोयना रस्त्याची दुरवस्थेला सध्याचे भाजप शिवसेना सरकार जबाबदार आहेत गेले दहा वर्षे हा रस्ता होतोय पण त्याचे काम काही पूर्ण होत नाही सरकारची तसेच ठेकेदाराची उदासीनता कारणीभूत असून रस्त्याचे ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सातारा जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस नरेश देसाई यांनी केली आहे. राज्याचे बांधकाममंत्री हे सातारा जिल्ह्यातील आहेत पण त्याना जिल्ह्यातील पाटण- कोयना रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे त्याकडे दुर्लक्ष त्यांचे दुर्लक्ष होत आहे.

सार्वजनिक बांधकाममंत्री छ.ना. शिवेंद्रराजे भोसले आणि पालकमंत्री यांनी या रस्त्याची तात्काळ पाहणी करावी आणि सर्व पक्षीयांची बैठक घेऊन या पाटण कोयना रस्त्याबाबत काय कारवाई करणार याची माहिती द्यावी आणि सदर रस्ता आठ दिवसात पूर्ववत सुरू करावा.

सदर रस्त्याची दुरुस्ती आठ दिवसात आणि रस्त्याचे काम किती महिन्यात पूर्ण करणार त्याची बांधकाम मंत्री आणि पालकमंत्री यांनी जनतेला त्याची टाईम लाईन द्यावी सदर पाटण कोयना वाहतुक आठ दिवसात प्रशासनाने पूर्ववत विना अडथळ्याची सुरू केलीनाही तर कराड चिपळूण मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हा कांग्रेस चे सरचिटणीस नरेश देसाई यांनी दिला आहे या आंदोलनात माजी सभापती एल एम पवार,अरविंद घाडगे, शीनिवास पाटील, एड राजन भिसे, दर्शन कबर, विष्णू सपकाळ,आनंदा कांबळे, नरेंद्र पाटणकर, पांडुरंग यादव,आनंद नांगरे, आदि काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी यांचेसह काँग्रेसचे कार्यकर्ते सहभागी होऊन भाजपा- शिवसेना सरकारला रस्ता रोको द्वारे जाब विचारतील.

# माझ गाव हे नावचं आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवणारे : वाघमारे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण (सातारा) :** माझ गाव हे नावचं आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवणारे आहे. एक आपलेपणा, उर्जा, ओढ ही गावाकडील मातीत असते. आज या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले खरतर नैतिकता शिकवणारा हा काव्यसंग्रह सर्वांच्या मनाचा ठाव घेणारा आहे असं मत प्रा. डॉ सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले.

'माझ गाव' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा मौजे आडदेव ता. पाटण याठिकाणी पार पडला. कवि साहित्यिक जगन्नाथ गायकवाड यांच्या दुसर्या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास प्रा. डॉ. सुभाष वाघमारे मराठी विभाग प्रमुख छ शिवाजी कॉलेज सातारा प्र स भाषा मंडळ कर्मवीर भाऊराव पाटील, अँड उत्तमराव पाटील मा अध्यक्ष कराड बार असो, कल्पना गायकवाड सरपंच आडदेव यांच्या प्रम ुख उपस्थिती मध्ये पार पडला.




प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांनी, संसारी असावे परी असून नसावे असे व्यक्तिमत्त्व लाभलेले जे डी या डोंगर कपार्यात जन्माला आले. जन्मापासून मरणापर्यंत च्या प्रवासात अनेक बदल होत जातात. जीवानात स्थितंतर होत जातात. जन्माला आलेला मरणाला असेल तर त्याच्या मध्ये जीवन आहे. जीवन कस जगायचे याबद्दल तत्वज्ञान अनेक जन सांगतात. मी अनेक ठिकाणी पाहिली परंतु आडदेव मध्ये जे सुख आहे ते कुठेही भेटले नाही. आडदेव हे नाव ऐकून आम्ही प्रेमात पडलो. सह्याद्री पर्वत रांगांमध्ये हे गाव वसलेले आहे. देवापेक्षा मला खर माणसं बरी वाटतात. नैतिकता माणसे शिकवतात. ईश्वर आम्ही पाहिला नाही परंतु त्याचे रुप या मंदीरात दिसते.

कवी गायकवाड हे मनाचा निर्मळ पणा आहे. कोणत्याही माणसाला मोकळेपणाने जवळ करतात. आडदेव च्या माणसाने आडदेव ची वाट प्रकाशमय केली. वाट उथवळी अस म्हणणं वावगं ठरणार नाही. स्वतः चा दिवा स्वतः व्हा. नितिमत्ता चांगली, स्वावलंबन, मित्रप्रेम सामान्य माणसे, कष्टकऱ्यांच्या वरती कविता लिहिणारे सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व आहे. स्पष्ट पणा हा दुर्गन नाही. आणि तो सर्वांच्या अंगी नसतो.

प्रास्ताविक अँड सी जे गायकवाड यांनी करताना, स्वावलंबन आपल्या अंगी असले पाहिजे. बिकट परिस्थिती मध्ये लोक घडतात. आयुष्यात अनेक चढ उतार येतात हिमतीने त्या संकटात मात करुन जीवन जगायचे असते. आयुष्यात येणारे लोक आपल्याला घडवतात आणि हे आमच्या गायकवाड कुटुंबाच्या बाबतीत घडले आहे. चांगल्या संगती आणि मैत्र आपल्या जीवनाला आकार देतात. समारंभ दरम्यान अँड अभयसिंह पाटील, पी के पाटील, पांडुरंग गायकवाड, प्रा. गायकवाड यांनी आपली मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमास अनेक साहित्य प्रेमी, ग्रामस्थ, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ताराबाई गायकवाड तर आभार महिपती गायकवाड यांनी मानले.

# चंद्रपूर जिल्ह्यातील पुलांचे संरचनात्मक परीक्षण करा खा. प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** जिल्ह्यामधील सर्व पुलांचे सखोल संरचनात्मक परीक्षण करण्याची मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली आहे. सध्याच्या पावसाळ्याच्या पृष्ठभूमीवर अस्तित्वातील पुलांच्या सुरक्षिततेबाबत आणि संरचनात्मक अखंडतेबाबत वाढत्या चिंता लक्षात घेता, ही मागणी करण्यात आली.

निवेदनात खासदार धानोरकर यांनी प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि संभाव्य अपघात टाळणे यावर भर दिला. जिल्ह्यातील अनेक पुल जुने असून जास्त वाहतूक, हवामानाची परिस्थिती आणि नियमित देखभालीच्या अभावामुळे त्यांची कालांतराने झीज झाली असण्याची शक्यता त्यांनी अधोरेखीत केली. नागरिकांची सुरक्षा सर्वात महत्वाची आहे, असेही त्या म्हणाल्या. पुलांमधील कोणतीही कमतरता किंवा नुकसान ओळखण्यासाठी आणि आवश्यक दुरुस्ती किंवा पुनर्रचना त्वरीत करण्यासाठी सखोल संरचनात्मक परीक्षण आवश्यक आहे. यामुळे केवळ अपघातातच टळणार नाहीत, तर जिल्ह्यातील सुरळीत कनेक्टिव्हीटी देखील सुनिश्चित होईल. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मंत्र्यांना या प्रक्रियेला गती देण्याचे आणि या महत्वाच्या परीक्षणासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करुन देण्याचे आवाहन केले आहे. खासदार



धानोरकर यांनी बसस्थानक ते प्रियदर्शिनी चौक या मार्गांवर नवीन रेल्वे पूल बांधण्याचा प्रस्ताव तयार करुन तातडीने मंजूरी देण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्र्याकडे केली आहे. जुना रेल्वे पूल अनेक वर्षांचा असल्यामुळे त्याला लागूनच नवीन रेल्वे पूल उभारणे अत्यंत गरजेचे असल्याचे धानोरकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

सध्या अस्तित्वात असलेला रेल्वे पूल जुना आणि अरुंद असल्यामुळे या मार्गांवर नेहमीच वाहतूक कोंडी होते. यामुळे प्रवाशांना, विशेषत: विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. हा प्रश्न तातडीने सोडवणे आवश्यक आहे. नवीन आणि प्रशस्त रेल्वे पूल झाल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होईल, प्रवाशांचा वेळ वाचेल आणि अपघात कमी होण्यास मदत होईल. खासदार धानोरकर यांनी मंत्र्यांना या प्रकल्पाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

# केज तालुक्यातील ढाकेफळ नजीक भरधाव कारच्या धडकेत १४ वर्षीय मुलाचा मृत्यू

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२०, केज :** आंबेजोगाई रोडवरील ढाकेफळ नजीक एका भरधाव वेगात असलेल्या कारने एका १४ वर्षीय मुलाला जोराची धडक दिली. कारणे दिलेल्या धडकेत १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे.

याबाबतची प्राथमिक मिळालेली माहिती अशी की, दिनांक २० जून २०२५ रोजी दुपारी ३-०० वाजण्याच्या दरम्यान केज- आंबेजोगाई रोड वरून आंबेजोगाई



कडून केज मार्गे बीडच्या दिशेने भरधाव वेगाने धावत असलेले कार क्र.एम पी-०९/ झेड जी-२८३७ सदर कार वरील चालकाचे नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला शेळ्या चारीत असलेला बाळू हरिदास काळे वय १४ वर्षे या १४ वर्षीय मुलाला कारणे जोराची धडक दिली. सदर कारने त्या मुलास धडक दिल्यानंतर कार रस्त्याच्या कडेला जाऊन खड्ड्यामध्ये पलटी झाली.

सदर कार मधून प्रवास करणारे हे मध्य प्रदेशातील इंदोर जिल्ह्यातील जितेंद्र रघुवंशी, हरिसिंग रघुवंशी हे दोघेजण जखमी झाले आहेत.

सदर अपघातात जोराची धडक लागलेल्या बाळू हरिदास काळे यास उपचारासाठी रुग्णवाहिकेतून बीड कडे घेऊन जात असताना केज शहरापासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर रुग्णवाहिका गेली असता रस्त्यामध्ये बाळू काळे याचा मृत्यू झाला आहे. जितेंद्र रघुवंशी यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचारासाठी पाठवण्यात आले तर हरिसिंग रघुवंशी यांच्यावर बीड येथे उपचार घेण्यासाठी पाठवण्यात आले आहे.

# थोडक्यात

## ऐरोलीत अनधिकृत शेडवर कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने जी विभाग ऐरोली अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात अनधिकृत शेडवर निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ऐरोली विभाग अंतर्गत ऐरोली येथील शिवार धाबा व साई कुटीर धाबा यांनी तात्पुरते शेड उभारण्यात आलेले होते. सदरचे अनधिकृत शेड नमुंमपाच्या कारवाई अंतर्गत निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी जेसीबी व मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## नाशिक जिल्ह्यात पावसाचा कहर; नाशिकला रेड अलर्ट

## विंचूरसह परिसरात मुसळधार पाऊस; शेतकऱ्यांचे नुकसान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्रात मान्सूनचे जोरदार आगमन झाले असून, नाशिक जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील पाच दिवस राज्यात बहुतांश भागांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. तसेच नाशिक जिल्ह्यात रेड अलर्ट वर्तवलेला आहे.

निफाड तालुक्यातील उत्तर भागात असणाऱ्या विंचूर, सुभाष नगर, विठ्ठलवाडी, हनुमान नगर या परिसरात बुधवारी दुपारी ४ ते ५ दरम्यान मुसळधार पावसाला सुरूवात झाली. निफाड तालुक्यातील उत्तर भागात असणाऱ्या विंचूर परिसरातील भागात काल ढगफुटी सदृश्य मुसळधार पाऊस झाला. या पावसाचा जोर इतका होता की, अनेक झाडे उन्मळून पडली. शेतीचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. शेतकऱ्यांच्या साठवलेल्या कांद्याच्या चाळीमध्ये पाणी शिरल्याने कांद्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. यंदा चांगल्या पाऊसाची सुरुवात झाल्याने, मका, सोयाबीन ही नगदी पिके चांगली होतील. मात्र ईतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याचा काही शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. नांदूर मधमेश्वर धरणातून दुपारी २ वाजता ३२०० क्यूसेक इतका विसर्ग गोदावरी पात्रात सोडण्यात आल्याने, नदीपात्राची पाण्याची पातळी वाढली आहे.

## नीट परीक्षेत ज्ञानेश्वरी भोरेचे उज्वल यश



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२०, धाराशिव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एकुरका शाळेची माजी विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी सुंदर भोरे हिने नीट परीक्षेमध्ये ५७० गुण घेऊन उज्वल यश संपादन केले. त्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करून प्रेरणेची थाप देण्यात आली.वडिलांचे छत्र हरवल्यानंतर सुद्धा अतिशय जिद्दीने अभ्यास करून ज्ञानेश्वरी न हे यश मिळवलेले आहे या यशाच्या पाठीमागे तिचे आजोबा सुबराव भोरे व आई अश्विनीताई भोरे यांचे परिश्रम व योगदान आहे. यामुळे परिवारासह ज्ञानेश्वरीचा शाळेचे मुख्याध्यापक बनसोडे सर यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश पवार यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील नागेंद्र होसाळे, बळीराम निकम,जवाहर माळी, वसंत इंगळे, जनार्दन धुमाळे, सुषमा धुमाळ यांनी परिश्रम घेतले.

## ढोकेश्वर कॉलेजमध्ये नवीन अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरु

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील जिल्हा मराठा विद्या प्रसारक सम ाज संस्थेचे श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नवीन अभ्यासक्रमांचा शुभारंभ झाला आहे. यामध्ये एम. कॉम. एम एस्सी, (ऑर्गे निक केमेस्ट्री),एम एस्सी (ऍनालिटिकल केमेस्ट्री),बी एस्सी (कॉम्प्युटर सायन्स) आणि बी.सी.ए. (मॅनेजमेंट) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी संस्थेने हे पाऊल उचलले आहे. महाविद्यालयात सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असून, प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी दिली. मतकर यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे,हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. नव्याने सुरू झालेले हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने नवीन संधी उपलब्ध करून देतील. महाविद्यालयात आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक केंद्र आणि अनुभवी प्राध्यापक उपलब्ध आहेत.

प्रवेश मर्यादित असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित प्रवेश निश्चित करावा,असे आवाहन डॉ.मतकर यांनी केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा असेही त्यांनी सुचविले. या उपक्रमामुळे श्री ढोकेश्वर कॉलेजने ग्रामीण शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन पर्व सुरू केले आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे अशी अपेक्षा संस्थेकडून होत आहे.